**संदर्भ:-** मा. अध्यक्ष, निवड समिती, राष्ट्रिय आरोग्य अभियान तथा आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक यांची दि. २७/११/२०२५ रोजीची मंजुर टिपणी

---

जा.क्र./सा.आ.वि./एनयूएचएम/डेस्क-२/७४६ /२०२५,
दि.- १३/१२/२०२५

राष्ट्रिय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नाशिक महानगरपालिका स्तरावरील PSYCHIATRIST - अर्धवेळ पॉलिक्लिनिक या कंत्राटी पदावर आपली नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्ती कालावधी हा पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झाल्यापासुन व वैदयकिय आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे कार्यालयात रुजुपत्र सादर केल्यापासुन ते २९/०६/२०२६ या कालावधीकरीता पुढील अटी व शर्तिच्या अधिन राहुन निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ क्र | नाव | पदनाम | मासिक मानधन | भेटीचे ठिकाण व वार |
|---|---|---|---|---|
| १ | DR. MEHTA SNEHA RAJENDRA | PSYCHIATRIST- अर्धवेळ पॉलिक्लिनिक | २०००/- प्रति भेटी व १००/- रुपये प्रति रुग्ण अधिकत्म ५०००/- | श.प्रा.आ.केंद्र, पंचवटी |
| २ | DR. KHABIYA TANVI SHWETA | PSYCHIATRIST- अर्धवेळ पॉलिक्लिनिक | २०००/- प्रति भेटी व १००/- रुपये प्रति रुग्ण अधिकत्म ५०००/- | श.प्रा.आ.केंद्र, कामटवाडे |
| | | | | श.प्रा.आ.केंद्र, सातपूर |
| | | | | श.प्रा.आ.केंद्र,मोरवाडी |
| | | | | श.प्रा.आ.केंद्र, मुलतानपुरा |
| | | | | श.प्रा.आ.केंद्र, नाशिक जिजामाता |

आदेश मिळालेपासुन ७ दिवसांचे आत (सुटटीचे दिवस वगळुन) पदस्थापनेच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा तुम्हास सदर नियुक्तीस रस नाही असे समजुन नियुक्ती रदद समजण्यात येईल.

**अटी व शर्ती**

१) कंत्राटी कर्मचारी यांनी कामावर रुजु होताना विहीत नमुन्यात र.रु.१००/- स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र/करारनामा सादर करणे बंधनकारक आहे. सदर करारनामा सादर न केल्यास आपले मानधन अदा केले जाणार नाही. सदयस्थितीत आपणावर कुठल्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही. याबाबत प्रतिज्ञापत्रात नमुद करावे.तसेच भविष्यात गुन्हा नोंद झाल्यास अथवा मागील गुन्हा आढळल्यास नियुक्ती संपुष्टात येईल.

२) सदर सेवा अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने आपण पदस्थापनेच्या ठिकाणी हजर झालेल्या दिनांकापासुन ते २९/०६/२०२६ या कालावधीकरीता राहिल.तदनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरीता वेगळा आदेश देण्यात येणार नाही किंवा वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही. सदर पदाकरीता अटीशर्तिच्या अधीन राहुन पुनर्नियुक्तीकरीता स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल.

३) सदर करारसेवेसाठी दरमहा वरील नमुद प्रमाणे मासिक मानधन भेटी व तपासलेल्या रुग्ण संख्येप्रमाणे असेल. अन्य कोणताही भत्ता दिला जाणार नाही. तसेच मनपावर कुठल्याही प्रकारे दायित्व राहणार नाही.

४) हा प्रकल्प काही कारणाने बंद पडला अथवा कार्यक्रम कृती आराखडयात नियुक्ती दिलेल्या पदास मंजुरी न मिळाल्यास आपली सेवा आपोआप संपुष्टात येईल.

५) कामाचे स्वरुप अर्धवेळ असुन १५ दिवसांतुन एकदा भेट देणे आहे. (प्रति शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र)

६) इतर कोणतीही रजा देय नाही. तसेच कोणत्याही प्रकारच्या रजा वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

७) आपण आपले कर्तव्य दरमहिन्याच्या व वर्षाच्या इष्टांकानुसार पुर्ण करणे अपेक्षित आहे. आपणास नियुक्त केलेल्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे Key performance indicators, SLA,Outcomes & indicator wise target प्रमाणे कामकाज करणे आपणाकडुन अपेक्षित आहे. वार्षिक उददीष्टांमध्ये लक्षणीय सुधारणा करणे अपेक्षित आहे.तसेच आपल्या प्रत्येक महिन्याचा तपशिल अहवाल सार्वजनिक आरोग्य विभाग,मुख्य कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

8) **Job responsibility of Specialists (Part time)**

i. Attend OPD as per the fixed schedule.

ii. OPD timing will be for 4 hours on the fixed date.

iii. Record of the all cases examined has to be kept by specialist and submitted to the in charge of the HWC.

iv. Medicines are to be prescribed from the available medicines from HWC, and should not be prescribed from private medical stores.

v. Required investigations will be advised from UPHC/UCHC.

vi. Counseling and follow up may be given to the patients.

vii. Patients may be referred to the government facilities as and when required or to the MJPJAY/ PMJAY empanelled facilities.

viii. The clinician has to be available on the decided date and time for the polyclinic OPD, to avoid the inconvenience to the patients.

ix. Specialist should not call the patients to his /her private hospital.

9) **Functions of Polyclinic:**

i. Polyclinic will be established in selected U-PHCs with space to have at least 2 beds for specialist care.

ii. If space available is limited, then each specialist will have fixed day of the week for providing services. Specialist such as Medicine, Obstetrics and Gynaecology, and Pediatrics can be called once a week and other specialists can be called once in every fortnight on fixed days depending upon response of the patients.

iii. Polyclinic services will be on OPD basis only.

iv. Outpatient specialist care, with provision for 2 day-care observation beds.

v. Fixed day rotational Specialist OPD services for following as per local needs and requirement

a. Medicine

b. Obstetrics and Gynaecology

c. Pediatrics

d. Ophthalmology including optometry

e. Dermatology

f. Psychiatry

g. ENT Specialist

vi. Laboratory tests for the specialists concerned along with point of care testing would be provided through HLL.

vii. Polyclinic will serve as a referral point and link with a telemedicine hub at a medical college, to reduce the congestion at secondary and tertiary level hospitals.

viii. Referral if required would be to government facilities / District hospitals or AB – PMJAY empanelled Private health facilities.

ix. Referral linkages can be established between the Urban CHC, UPHCs and Urban-HWCs to ensure continuum of care and assured care.

१०) अर्धवेळ वैदयकिय अधिकाऱ्यांना दिलेल्या ठिकाणी राष्ट्रिय शहरी आरोग्य अभियान,पुर्णवेळ वैदयकिय अधिकारी, श.प्रा.आ.केंद्र,नोडल वैदयकिय अधिकारी तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

११) महाराष्ट्र मेडिकल कौंन्सिलचे रजिस्ट्रेशन नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.

१२) मार्गदर्शक सुचनेनुसार आपणास नमुद दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी हजेरी पत्रकावर स्वाक्षरी तसेच बायोमेट्रीक (सेल्फि) करणे बंधनकारक आहे. अन्यथा आपले मानधन अदा केले जाणार नाही.

१३) वार्षिक उददीष्टांप्रमाणे कार्यमुल्यांकन अहवालानुसार (Performance Report) कामकाज पुर्ण करणे आवश्यक राहील. कामकाज असमाधानकारक असल्यास नियुक्ती संपुष्टात आणण्यात येतील.

१४) जर करारसेवा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा वैदयकिय आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडे एक महिना अगोदर नोटीस दयावे लागेल अन्यथा एक महिन्याचा मोबदला भरावा लागेल.

१५) या सेवा करार पध्दतीच्या असल्याने कायम स्वरुपी नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.तसेच मनपा येथे नोकरीत कुठलाही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

१६) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा येत नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही.

१७) करार सेवा कार्यभार सांभाळताना शासन अथवा खाजगी मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जे नुकसान होईल त्यांची संपुर्ण जबाबदारी करार सेवकावर राहिल. सदर नुकसानीची भरपाई न केल्यास वसुली जमील महसुल वसुली पध्दतीने करण्यात येईल.

१८) नाशिक महानगरपालिकेतर्फे रोगनिदान शिबिर, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर इ. आयोजीत केली असता सदर शिबिराच्या ठिकाणी हजर राहून रुग्णांना सेवा देणे बंधनकारक राहील.

१९) ज्या कंत्राटी कर्मचारी यांची कर्तव्यात अनियमितता आढळुन येईल अथवा रुग्णांकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नोंद घेऊन व सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणुन त्याबाबत नियमानुसार दखल घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

२०) कंत्राटी कर्मचारी यांना आपत्कालीन परीस्थितीत अथवा आवश्यक असल्यास मनपाच्या इतर रुग्णालयात/शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रात सुध्दा सेवा पुरवावी लागेल.

२१) शासन/महापालिका नियमानुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच वैदयकिय अधिक्षक/वैदयकिय अधिकारी अथवा वैदयकिय (आरोग्य) अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

२२) नियुक्ती झालेनंतर संबधित कंत्राटी कर्मचारी यांनी रुजु अहवालाची व नियुक्तीची एक प्रत तसेच प्रत्येकी ३ प्रतिमध्ये आधारकार्ड,पॅनकार्ड, बॅकेच्या पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत व एक कॅन्सल चेक व्यक्तिशः आपल्या रुग्णालयातील/श.प्रा.आ.केंद्रातील संबधित डी.ई.ओ.कम अकौटट यांना मानधन अदा करणेकामी माहिती दयावी.

२३) अ)केंद्रशासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास त्यांची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ सेवा समाप्त करण्यात येतील.

ब) योजनानिहाय आढावा घेऊन आवश्यकतेनुसार कर्मचारी यांना एका ठिकाणाहुन दुसया ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येईल

२४) नियुक्ती आदेशातील अटीशर्तिमध्ये वेळोवेळी बदल करणे अथवा नियुक्ती संपुष्टात आणणे याबाबत सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवले आहेत.

- मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने

sd/-
वैदयकिय आरोग्य अधिकारी
नाशिक महानगरपालिका नाशिक

प्रत माहित्िस्तव सविनय सादर –

१) मा आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा. आ. अ., मुंबई.

2) मा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक.

प्रत कार्यावाहीस्तव

नोडल वैदयकिय अधिकारी – संबधित
पुर्ण वेळ वैदयकिय अधिकारी -संबंधित
डिईओ कम अकौटंट- संबंधित